# भूमिगत मार्गिकेच्या कामाची वाखाणणी

## 'आयआयएम'च्या माजी प्राध्यापकांकडून मेट्रो ३ मार्गिकेची पाहणी

**म. टा. खास प्रतिनिधी**



मुंबई : मुंबईसारख्या वर्दळीच्या भागात जमिनीखाली खणण्यात आलेल्या भुयारी मेट्रो मार्गिकेच्या कामाची माहिती भारतीय व्यवस्थापन संस्थेपर्यंत (आयआयएम) पोहोचली आहे. या पार्श्वभूमीवर आयआयएम अहमदाबाद व आयआयएम, बंगळुरूशी संबंधित प्राध्यापकांनी अलिकडेच या मार्गिकेला भेट दिली.

आरे ते कफ परेड- मेट्रो ३ ही ३३ किमी लांबीची राज्यातील पहिली भूमिगत मार्गिका आहे. २७ पैकी २६ भुयारी स्थानकांचा समावेश असलेल्या या मार्गिकेचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ ला आरे ते बीकेसी असा सुरू होणार आहे. यांतील प्रामुख्याने दक्षिण मुंबईतील स्थानके ही वारसा इमारतींच्या खाली बांधण्यात आली आहेत. त्यामुळेच या कामाबाबत आयआयएमकडून माहिती घेतली जात आहे.

प्रा. जी. रघुराम हे आयआयएम, बंगळुरू व आयआयएम, अहमदाबाद येथील माजी प्राध्यापक आहेत. त्यांनी अलिकडेच मेट्रो ३च्या चर्चगेट व छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ या स्थानकांना त्यांनी भेट दिली. यापैकी चर्चगेट स्थानक हे दुसऱ्या टप्प्यातील आहे. मात्र अनेक वारसा इमारतींच्या खाली बांधण्यात आले आहे. ती प्रक्रिया व त्यासाठीचे व्यवस्थापन यांची माहिती प्रा. रघुराम यांनी मेट्रो ३ उभी करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून (एमएमआरसी) जाणून घेतली. तसेच विमानतळाला संलग्न होणाऱ्या स्थानकाबाबतही त्यांनी माहिती घेतली. देशातील दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वाधिक व्यग्र विमानतळ परिसराच्या उदरातील या कामाबाबत त्यांनी एमएमआरसीच्या व्यवस्थापनाची प्रशंसा केली.